**<u>नियमित दिवाणी कज्ञा क्र. १२९/२०१७ मधील नि.क्र.५३ वरील आदेश</u>**

( पारीत दिनांक – ०४/०१/२०२४)

चंद्रकांत सातगोंडा पाटील विरुध्द कलगोंडा मलगोंडा पाटील.

**CNR - MHKO130013942016**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ अन्वये वादपत्रामध्ये दुरुस्ती होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादीच्या कथनानुसार, सदरची दावा मिळकत ही मुळची मयत मलगोंडा बाळागोंडा पाटील यांच्या मालकीची होती. त्यांनी दि. ०७/०३/१९८० रोजी त्यांचे एकमेव व अखेरचे मृत्यूपत्र लिहून ठेवल्याचे प्रस्तुत दाव्यात नमुद केले आहे. सदर मृत्यूपत्राप्रमाणे त्यांची पत्नी व प्रतिवादी क्र. १ यांना मिळकती देण्यात आल्याचेही नमुद करण्यात आले आहे. वरील मृत्यूपत्राप्रमाणे मिळालेल्या मिळकती या त्यांची पत्नी आक्काताई यांनी दि. २९/११/१९९६ च्या मृत्यूपत्रानुसार वादी यांना दिल्याचे नमुद करण्यात आले आहे.

**०३.** वादीच्या पुढील कथनानुसार, सदर मृत्यूपत्रान्वये कोल्हापूर येथील दिवाणी न्यायालयात प्रोबेट मिळणेकरीता किरकोळ अर्ज क्र. ७६/२००४ हा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाच्या कामी झालेल्या निर्णयाविरोधात प्रतिवादी क्र. १ यांनी मे.जिल्हा न्यायालय कोल्हापूर येथे नियमित दिवाणी अपील क्र. १८१/२०१३ हे दाखल केले होते. तथापि, सदर अपील हे दि. ०९/०३/२०१६ रोजी काढून टाकण्यात आले आहे. वरील सर्व वस्तुस्थिती दर्शविण्याबाबत कागदपत्रे व पुरावा दाखल करण्यात आला आहे. सदरील वस्तुस्थिती ही या दाव्यास कारण घडण्यामध्ये व सदरचा दावा  मुदतीत असल्याचे दर्शविण्याकरीता गरजेची असल्याचे दिसून येते.

**०४.** वादीच्या पुढील कथनानुसार, वादीने सदरची वस्तुस्थिती दाव्यास कारण या शिर्षकाखाली या दाव्यामध्ये नमुद केली आहे. मात्र, दाव्यास मुदत या कलमांअतर्गत  काही मजकूर वादीस समाविष्ट करण्याचा आहे. सबब, दाव्यास मुदत या कलमांतर्गत वरील मजकुराच्या अनुषंगाने वादीस काही मजकूर समाविष्ट करण्याचा असल्याने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०५.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असून

प्रतिवादींनी अर्जातील पूर्ण कथनांचा इन्कार केला आहे. कोणत्या कारणास्तव वादी प्रस्तावित दुरुस्ती अर्जामध्ये करत आहे याचे कारण अर्जात नमुद नसल्याचे प्रतिवादीचे कथन आहे. याप्रकरणी वादीचा सरतपास, उलटतपास पूर्ण झालेनंतर वादीला पुरावा देणेचा नाही अशी पुरसिस वादीने दिली आहे. सदरचे प्रकरण सद्यस्थितीत प्रतिवादीच्या उलटतपासाकरीता नेमले आहे. प्रस्तुतचा अर्ज या स्टेजला चालण्यास पात्र नाही. वादीने त्याच्या पुराव्यामध्ये उलटतपासात काही बाबी मान्य केलेल्या आहेत, सदर बाबींना शह देण्याकरीता व दाव्यातील व जबाबातील त्रुटी भरुन काढण्याकरीता प्रस्तुत अर्ज वादीने दाखल केला आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

**०६.** उभय बाजुंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**०७.** प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालील प्रश्न बिंदू (Points) माझ्यासमोर उपस्थित झाले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसे सहित, मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.–

| **अ.क्र.** | **प्रश्न बिंदू (Points)** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादपत्रातील प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याच्या गुणदोषावरील अंतिम निर्णयाकरीता गरजेची आहे का ? | होकारार्थी |
| २. | प्रस्तुतच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलेल का ? | नकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**– का र ण मिं मा सा –**

**प्रश्न बिंदू क्र. १ व २ बाबतः–**

**०८.** वरील सर्व प्रश्न बिंदू हे एकमेकांशी निगडीत असल्याने अर्जातील वस्तुस्थितीची पुनरावृत्ती टाळण्याकरीता, वरील दोन्ही प्रश्न बिंदूची एकत्रितरित्या चर्चा करण्यात येत आहे.

**०९.** प्रस्तुत अर्जाचे अवलोकन करता, वादी हे आक्काताई मलगोंडा पाटील

यांच्या मृत्यूपत्रान्वये काही मिळकती या वादीला दिल्या होत्या व त्या मृत्यूपत्रान्वये न्यायालयामध्ये प्रोबेट दाखला मिळवणेकरीता अर्ज प्रलंबित होता. सदर अर्जाच्या निकालाच्या अनुषंगाने झालेला विस्तृत असा तपशील वादी हे न्यायालयासमोर मांडू इच्छीत आहेत असे दिसते.

**१०.** वस्तुतः, प्रस्तुत प्रकरणातील वादपत्राचे अवलोकन करता, वरील मृत्यूपत्राचा उल्लेख वादी यांनी दाव्यास कारण या शिर्षकाखाली दाव्यात आधीच नमुद केला आहे असे दिसते. मात्र, प्रस्तुत अर्जान्वये मृत्यूपत्राबाबतचा व त्याअनुषंगाने घडलेल्या न्यायालयीन घडामोडींचा विस्तृत असा मजकूर वादी दाव्यामध्ये समाविष्ट करु इच्छीत आहेत असे दिसते.

**११.** निर्विवादीतपणे, दुरुस्ती अर्जाचे अवलोकन करता, प्रस्तावित दुरुस्तीअन्वये वादी नवीन केस निर्माण करु इच्छीत आहेत असे दिसून येत नाही. वर उल्लेख केल्याप्रमाणे मृत्यूपत्राबाबतचा उल्लेख वादीने आधीच दाव्यामध्ये केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये वरील मृत्यूपत्रा बाबतचा विस्तृत असा तपशिल अभिलेखावर आणल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होईल असे निश्चितच वाटत नाही. प्रस्तावित दुरुस्तीअन्वये वादपत्रातील विनंती परिच्छेदामध्ये देखील कोणताही बदल होत नाही असे दिसून येते. वरील सर्व कारणास्तव सदरची दुरुस्ती ही न्यायोचित आहे असे माझे मत आहे. त्यामुळे, मी प्रश्नबिंदू क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी व प्रश्नबिंदू क्रमांक २ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>प्रश्न बिंदू क्र. ३ बाबतः–</u>**

**१२.** प्रश्न बिंदू क्र. १ चे उत्तर होकारार्थी व प्रश्नबिंदू क्रमांक २ चे उत्तर नकारार्थी देण्यात आल्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सदरचे प्रकरण हे ०७ वर्षे जुने आहे. प्रस्तुत प्रकरण हे सद्यस्थितीत प्रतिवादीच्या पुराव्याकरीता नेमण्यात आलेले आहे. त्यानंतर वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदरच्या अर्जामुळे दाव्यास विलंब झाला आहे. त्या विलंबाकरीता काही रक्कम खर्च म्हणून वादीवर बसविणे योग्य राहील. सबब, मी प्रश्न बिंदू क्र. ३ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

**<u>– आ दे श –</u>**

१) अर्ज (निशाणी क्र.५३) वादीने प्रतिवादीस ०७ दिवसांच्या आत

रक्कम रु. ३,०००/- खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादीनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर वादपत्रामध्ये त्वरीत दुरुस्ती करुन घ्यावी व वादपत्राची सुधारीत प्रत अभिलेखावर त्वरीत दाखल करावी.

स्वाक्षरी/-.

कागल.

**(अमोल भारत जवळे)**

दिनांक - ०४/०१/२०२४

सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.